PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 1

# पुणे करार : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

**श्री. आचार्य विनोद धोंडीराम,**
सहा. प्राध्यापक,
राजशास्त्र विभाग,
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा
जिल्हा उस्मानाबाद. **महाराष्ट्र भारत**

**गोषवारा :–(Abstract)**

प्रस्तुत शोधनिबंध हा स्थानिक भारतीयांसाठी स्वंयसत्ता असलेली राज्यघटना संरचीत करण्याच्या दृष्टीने उचलले गेलेल्या पवालांचा आढावा घेणे हा आहे. त्याकरिता १९३० ते ३२ या काळात ब्रिटिश सरकारने वेगवेगळया पक्षांच्या नेत्यांना गोलमेज परिषदेसाठी निमंत्रित केले होते. त्यावेळी या घटनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघांचा मुददा उपस्थित केला होता. अशा तरतुदी मुस्लिम, ख्रिश्चन,ॲन्ग्लो इंडियन, व शिख यांच्यासह इतर अल्पसंख्यांकाकरिता अगोदरपासूनच लागू होत्या. ब्रिटिश सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही मागणी मान्य केली. आणि ब्रिटिश पंतप्रधान यांनी जातीय निवाडा या सदराखाली ब्रिटिश इंडियाच्या राज्यघटनेमध्ये अंतर्भत करण्याचे ठरले. परंतू गांधीजींनी त्या जातीय निवाडयाला कसून विरोध केला. त्यांना वाटले की यामुळे त्यांना हिंदू समाजामध्ये विषमता प्रस्थापित होईल. त्यांनी पुण्याच्या येरवडा तुरुगामध्ये २० सप्टेंबर १९३२ पासून बेमुदत उपोषणास प्रारंभ केला. या शोधनिबंधामध्ये शोषित समाज ही संज्ञा अस्पृश्य समाज दर्शविण्यासाठी उपयोगात आणली आहे. ज्यांना पुढे स्वतंत्र भारतात भारतीय ॲक्ट १९३५ व पुन्हा भारतीय घटनेनुसार १९५० शेडयुल्ड कास्ट्स व शेडयुल्ड ट्राईब्स असे संबोधले जाते.

**मुख्य संज्ञा** :– पुणे करार, शोषित समाज, स्वतंत्र मतदारसंघ, महात्मा गांधी , डॉ. आंबेडकर, राजयकीय समता, इत्यादी

**प्रस्तावना :–**

आगॅस्ट १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधान रॉमसे मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला. परतु ब्रिटीशांच्या फोडा, झोडा आणि राज्य करा अशा धोरणांचाच एक भाग अशा पध्दतीनेच या कडे पाहिले गेले. तथापि मुस्लिम,शिख, व

ख्रिश्चन यांना अगोदरपासूनच अल्पसंख्यांक म्हणून मान्यता मिळाली होती. जातीय निवडयानुसार शोषीत समाजाला देखिल अल्पसंख्यांकाच्या यादीत बसविले गेले आणि त्यांच्या करिता वेगळया मतदारसंघाची योजना करण्यात आली.

**कॉंग्रेसची भुमिका :—**

स्वतंत्र मतदारसंघांना विरोध असला तरही अल्पसंख्यांकाच्या संमतीशिवाय जातीय निवाडयाखाली कोणताही बदल करण्यास कॉंगेस तयार नव्हती. जातीय निवाडा हा प्रखरपणे अमान्य करीत असताना कॉंग्रेसने तो स्वीकारलाही नाही व तो नाकारलाही नाही. परंतू इतर हिंदूपासून शोषित समाजाला अलग करणे व त्यांना स्वतंत्र राजकीय अस्तित्व देणे हा प्रयत्न हाणून पाडण्याचा चंग सर्व राष्ट्वाद्यांनी बांधला होता.

**गांधीजींचा प्रतिसाद :—**

गांधीजींना हा जातीय निवाडा म्हणजे भारतीय एकात्मता व राष्ट्रीयत्वावर आघात आहे असे वाटत होते. त्यांना हा निवाडा हिंदू व शोषित समाज या दोहोकरीता देखिल हानिकारक वाटत होता. कारण त्यामध्ये शोषित समाजाचे सामाजिक अध:पतन किंवा त्यांचा तशी अवस्था या बदल काहीच स्पष्ट उत्तर नव्हते. त्यांनी विंतडवाद केला की जर एकदा शोषित समाजाला स्वतंत्र लेखले गेले की अस्पृश्यांचे म्हणून अस्पृश्यता म्हणून कायमचीच आस्तित्वात राहिल.त्याच्या मते शोषित समाजाच्या तथाकथित हितसंबंधांचे रक्षण करणे हे गरजेचे नसून शोषित समाजाला स्वतंत्र लेखले गेले की अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न मागे पडेल. कारण अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ म्हणजे हे मतदारसंघ अस्पश्याचें म्हणून अश्यपृश्ता कायमचीच आस्तित्वात मूळ शोधून त्याचे मते शोषीत समाजासाठी संयुक्त किंवा शक्य असेल तर व्यापक मतदारसंघ किंवा विशेष मताधिकारी यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात राखीव जागांना कोणतीही हरकत न घेता त्यांचा विचार केला जाउ शकतो. आपल्या अशा मागणीसाठी हटटाला पेटून त्यांनी २० सप्टेंबर १९३२ रोजी अमरण उपोषण सुरु केले. त्यानंतर अनेक नेत्यांनी उदा. राजाह एम्. सी.व पं. मदन माहेन मालवीय यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मतपिरिवर्तन करुन पुणे कराराच्या माध्यमातून महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात समेंट घडवून आणला. त्यालाच आज आपण पुणे करारच्या माध्यमातून ओळखतो.

**पुणे करार :—**

अशा रीतीने सप्टेंबर १९३२ मध्ये दलित शोषित समाजातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघाच्या हक्काचा त्याग कुरन करारवर स्वाक्षरी केली. परतु शोषित समाजकरीता अरक्षित जागांची संख्या प्रातीय विधीमंडळात ७१ वरुन १४७ पर्यंत व १८% पर्यंत केंद्रीय विधीमंडामध्ये वाढविण्यात आली. पुणे करार हा सरकारने जातीय निवाडयामध्ये घटनादुरुस्ती म्हणून स्वीकारला

**दलितांच्या राजकीय सशक्तीकरणाची प्रक्रिया**

महात्मा गांधीजींच्या अडमुठया धोरणामुळे संपूर्ण देशात खळबळ माजून गेली. उपोषणाचा कालावधी जसजसा वाढत जात होता तसतसा गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न सुरु झाले इतर हिंदू समाजातील नेते व दलित शोषित समाजातील नेते यांच्यामध्ये तडजोड सुरु झाली. मुंबई संप्टेबर २५ ला एका सार्वजनिक मिटींग मध्ये ठराव जाहिर करण्यात आला यापुढे हिंदू समाजामध्ये जन्मावरुन कोणीही कोणास अस्पृश्य समजण्यात येणार नाही. आणि इतर हिंदू प्रमाणोच सर्व समाजिक संस्थांमध्ये शोषित समाजातील नागरिकांना देखिल सर्व हक्क असतील. ही दलित शोषित

समाजाच्या चळवळीच्या इतिहासातील ठळक व महत्त्वपुर्ण घटना पुढील काळामध्ये दलित शोषित समाजाच्या राजकीय सशक्तीकरणाचा पाया रोवण्यासाठी कारणीभुत ठरली तसेच भारतीय लोकशाही व्यवस्था मजबुत होण्यासाठी देखिल कारणीभुत ठरली.

**पुणे कराराच्या शर्ती**

१. सामन्य इलेक्टोरेट मध्ये प्रांतीय विधीमंडळात खालीलप्रमाणे शोषित समाजासाठी जागा आरक्षित असतील:—

| | |
|---|---|
| म्द्रास | ३० |
| मंबई सह सिंध | १५ |
| पंजाब | ०८ |
| बिहार व ओरिसा | १८ |
| केंद्रीय प्रांत | २० |
| आसाम | ०७ |
| बंगाल | ३० |
| संयुक्त प्रांत | २० |
| **एकूण** | **१४८** |

वरील सर्व अंक हे ब्रिटिश पंप्रधानांच्या निर्णया नुसार जाहीर केलेल्या प्रॉव्हीन्सीयल काउन्सील च्या संपुर्ण संख्येवर आधारित आहेत.

२. याकरिता निवडणुका हया संयुक्त मतदारसंघ पध्दतीने घेण्याचे योजले, तथापि त्याची प्रक्रीया अशी All members of the Depressed Classes registered in the general electoral roll of a constituency will form an electoral college which will elect a panel of four candidates belonging to the Depressed classes for each of such reserved seats by the method of the single vote and four persons getting the highest number of votes in such primary elections shall be the candidates for election by the general electorate.

३. केंद्रीय विधीमंडळात दलित शोषित समाजाचे प्रतिनिधीत्व हे जॉईन्ट इलेक्टोरेटच्या व आरक्षीत जागांच्या तत्वाप्रमाणेच असेल.

४. केंद्रीय विधीमंडळ केंद्रीय विधीमंडळाता १८% जागा ब्रिटिश इंडियाच्या जनरल इलेक्टोरेट मध्ये दलित शोषित समाजाकरिता आरक्षित ठेवण्यात येतील.

५. जर खालील कलम ६ नुसार परस्पर मान्यता घेउन ती टरमिनेट केलेली नसेल तर प्रांतीय तसेच केंद्रीय विधीमंडळांच्या निवडणुकांच्या उमेदवारांच्या पॅनल करिता प्राथमिक निवडणुक यंत्रणा ही पाहिल्या दहा वर्षात संपुष्टात आणली जाईल.

६. आरक्षित जागांद्वारे निर्धारित दलित शोषित समाजाच्या प्रतिनिधीत्वाची व्यवस्था (कलम १ व ४ मध्ये निर्देशित कल्याप्रमाणे) तो पर्यंत चालू राहील. जो पर्यंत समझोत्यामधील संबंधीत समुदायामध्ये परस्पर संमेंट कायम असेल.

७. दलित शोषित समाजातील व्यक्तींना प्रांतीय व केंद्रीय विधीमंडळाकरता मताधिकाराचा हक्क लोथियन समीतीच्या अहवालात निर्देशीत केल्याप्रमाणे असेल.

८. कोणत्या स्थानिक मंडळाच्या निवडणुकांमध्ये किंवा लोकसेवेच्या नेमणुकांमध्ये दलित शोषित समाजाच्या नागरिकाला तो दलित असल्याच्या कारणावरुन त्याला अपात्र ठरविता येणार नाही. दलित शोषित समाजाचे नेतृत्व सुरक्षित ठेवण्यासाठी हर एक प्रयत्न केला जाईल. लोकसेवेकरिता उमेदवाराची शैक्षणिक पात्रता हा नेमणुकीकरीता निकष असेल.

९. प्रत्येक प्रांतामध्ये, शैक्षिणिक अनुदानातुन पुरेशी रक्कम दलित शोषित समाजाच्या नागरिकांकरीता शैक्षिणिक सुविधा पुरविण्यासाठी निर्धारित केली जाईल.

जेव्हा पहिल्या गोलमेज परिषेदमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या योजनेला पाठींबा दिला तेव्हा गांधीजींनी त्याला कडाडून विरोध केला तो ही या सबबीवरुन की त्यामुळे समस्त हिंदू समाजाचे विघटन होईल. त्यांनी दिनांक २० संप्टेंबर १९३२ पासून पुण्याचा येरवडा तुरुंगामध्ये ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या निर्णायाच्या विरोधात बेमुदत उपोषणास प्रारंभ केला.

**विधीमंडळात दलित शोषित समाजाचे प्रतिनिधीत्व :—**

दलित समाजाच्या विधीमंडळातील प्रतिनिधीत्वासंबंधी तसेच काही इतर कल्याणकारी बाबींसंबंधी दलित नेते व इतर समुदायांचे नेते खालील मुद्यांवर येवून थांबले

१. प्रांतीय विधीमंडळामध्ये जनरल इलेक्टोरेट च्या एकूण जांगापैकी दलित शोषित समाजाकरिता खालील प्रमाणे जागा आरक्षित असतील मद्रास ३० मंबई सह सिंध १५, पंजाब ८, बिहार व ओरिसा १८ केंद्रीय प्रात २०, आसाम ७, बंगाल ३०, संयुक्त प्रांत २०, एकूण १४८ ही सर्व आकडेवारी हे ब्रिटिश पंतप्रधानांच्या निर्णयानुसार जाहिर केलेल्या प्रॉव्हीन्सीयल च्या संपूर्ण संख्येवर आधारित आहे.

2- याकरिता निवडणुका हया संयुक्त मतदारसंघ पध्दतीने घेण्याचे ठरले. तथापि त्याची प्रक्रिया अशी All members of the Depressed Classes registered in the general electoral roll of a constituency will form an electoral college which will elect a panel of four candidates belonging to the Depressed classes for each of such reserved seats by the method of the single vote and four persons getting the highest number of votes in such primary elections shall be the candidates for election by the general electorate.

अशा प्रकारे दलितांचा राजकीय समतेच्या दृष्टीकोनातून जास्तीत जास्त कसा फायदा होईल. याचा विचार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटी करारावर स्वाक्षरी केली आणि त्यांनंतर म. गांधीनी उपोषण सोडले.

## निष्कर्ष :—

१. स्वतंत्र मतदारसंघाची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उचलून धरली कारण अशी तरतुद मुस्लिम,ख्रिश्चन, अॅन्ग्लो इंडियन तसेच शिख समुदायाकरिता अगोदरपासून आस्तित्वात होती.

२. हिंदू समाजाचे विघटन होईल. या सबबीवर महात्मा गांधी यांनी जातीय निवाडयाला कडाडून विरोध केला. त्यांनी पुण्याच्या येरवडा कारागृहामध्ये दिनांक :२० सप्टेंबर १९३२ पासून जातीय निवाडयास विरोध करण्याकरिता बेमुदत उपोषणास प्रारंभ केला.

३. सप्टेंबर १९३२ मध्ये दलित शोषित समाजातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघांच्या हक्काचा त्याग करुन करारवर स्वाक्षरी केली. परंतु शोषित समाजाकरिता आरक्षित जागांची संख्या प्रांतीय विधीमंडळात ७१ वरुन १४७ पर्यंत व १८% पर्यंत केंद्रीय विधीमंडळामध्ये वाढविण्यात आली.

४. प्रांतीय विधीमंडळामध्ये जनरल इलेक्टोरेट च्या एकूण जागांपैकी दलित शोषित समाजाकरिता खालील प्रमाणे जागा आरक्षित असतील :— मद्रास ३० मंबई सह सिंध १५, पंजाब ८, बिहार व ओरिसा १८ केंद्रीय प्रात २०, आसाम ७, बंगाल ३०, संयुक्त प्रांत २०, एकूण १४८ ही सर्व आकडेवारी हे ब्रिटिश पंतप्रधानांच्या निर्णयानुसार जाहिर केलेल्या प्रॉव्हीन्सीयल च्या संपूर्ण संख्येवर आधारित आहे.

## संदर्भ सूची :—

Ambedkar , B.R. 1982 Report on the Constitution of the Govt. F Bombay Presidency in Dr. Babasaheb Ambedakr Writing and Speeches, Vol. 2, Bombay, Govt. Of Maharashtra.

Ambedkar, B.R. 1987 Anniliation of Caste. Banglore: Dalit Sahitya Aademy.

Bayly, Susan. 1999 Caste and Politics in India. New Delhi: Cambridge University Press.

Beteille Andre (2005) Caste, Calss and Power: Changing Pattern in a Tanjore Village ( Delhi Oxford University Press)